अहवाल

# "नशा मुक्त भारत अभियान" अंतर्गत "नशा मुक्त सप्ताह" उपक्रम

**कालावधी : दि. २४ जून २०२६ ते २६ जून २०२६**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार तसेच समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार "नशा मुक्त भारत अभियान" अंतर्गत "नशा मुक्त सप्ताह" निमित्त सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर येथील राष्ट्रीय छात्र सेना (NCC) व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच **शहापूर पोलीस स्टेशनच्या सहकार्याने** जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये, युवकांमध्ये तसेच समाजामध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणे, व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी माहिती देणे आणि निरोगी, सुदृढ व व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सकारात्मक संदेश देणे हा होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांसाठी **गटचर्चा (Group Discussion)** आयोजित करण्यात आली. या चर्चेमध्ये विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी आवश्यक उपाययोजना, युवकांची भूमिका, सामाजिक जबाबदारी, कुटुंबातील जागरूकता तसेच शैक्षणिक संस्था व पोलीस प्रशासन यांची भूमिका याविषयी उत्स्फूर्तपणे आपली मते मांडली. विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला.

त्यानंतर **व्यसनमुक्ती विषयावर महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. एल. गायकवाड सरांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.** या व्याख्यानात त्यांनी व्यसनांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक दुष्परिणाम, युवकांची जबाबदारी, कायदेशीर बाबी, व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचे उपाय तसेच निरोगी जीवनशैली याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नंतर उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांना "**नशामुक्त भारत**" ही सामूहिक शपथ देण्यात आली.

यानंतर **शहापूर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने** महाविद्यालय परिसरातून व्यसनमुक्ती जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी "व्यसनाला नकार – आरोग्याला स्वीकार", "व्यसनमुक्त युवा – सशक्त भारत", "Say No to Drugs" अशा विविध घोषणांद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी हातात जनजागृतीपर फलक घेऊन व्यसनमुक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. रॅलीदरम्यान शहापूर पोलिसांनी वाहतूक नियोजन, सुरक्षितता आणि जनजागृती अभियान यामध्ये मोलाचे सहकार्य केले. रॅलीनंतर तसेच शहापूर पोलिसांच्या प्रतिनिधींनी व्यसनमुक्त जीवन स्वीकारण्याचे आवाहन केले.

संपूर्ण कार्यक्रमामध्ये NCC कॅडेट्स, NSS स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यलयातील विद्यार्थी , शहापूर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी असे एकूण १६८ जणांनी सक्रिय सहभाग नोंदविला. शहापूर पोलिसांच्या सहकार्यामुळे जनजागृती रॅली व इतर उपक्रमांचे नियोजन सुरक्षित, शिस्तबद्ध व प्रभावीपणे पार पडले.

**या सर्व कार्यक्रमाची यशस्वी जबाबदारी सोनुभाऊ बसवंत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ जी. जी. सोनवणे, NCC युनिट चे प्रमुख लेफ्टनंट डॉ. एस . एस. बुधवंत आणि NSS चे कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. एस. शनवार व प्रा. एस. एम. तडवी यांनी पार पाडली.**


राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME
NCC UNIT
GPS Map Camera
Google
Shahapur, Maharashtra, India
F838+7mc S.b.college, Savroli Rd, Near Government
Godown, Shahapur, Maharashtra 421601, India
Lat 19.453099° Long 73.31693°
गुरुवार, 25/06/2026 09:39 AM GMT +05:30


नशा मुक्त भारत अभियान
KARAN


KARAN


सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय,
राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME
NOT ME BUT YOU
NCC UNIT
MAHARASHTRA BATTALION NCC
MUMBAI GROUP-B


शहापूर पोलीस ठाणे
• ठाणे ग्रामीण •
BHAU BASWANT COLLEGE OF ARTS & COMMER
DIST-THANE
भाऊ बसवंत कला व
महाविद्यालय,
शहापूर, जि.ठाणे
राष्ट्रीय सेवा योजना
TIONAL SERVICE SCHEME
NOT ME BUT YOU
नशा मुक्त भारत अभियान
KARAN


KARAN